**Publication:** Pudhari
**Date:** 10/10/2012
**Edition:** Mumbai
**Page No.:** 3
**Headline:** TCS IT Wiz competition from 14th October.

# १४ ऑक्टोबरपासून टीसीएस आयटी विझ स्पर्धा

## विजेता गट राष्ट्रीय स्तरावरील अंतिम फेरीत मुंबईचे प्रतिनिधित्व करणार

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतातील सर्वात मोठी आंतरशालेय आयटी प्रश्नमंजुषा असलेल्या टीसीएस आयटी विझच्या मुंबई पर्वास १४ ऑक्टोबरपासून सुरुवात होणार आहे. वांद्रे रेक्लमेशन येथील इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या माणिक सभागृहात ही स्पर्धा होणार आहे. आठवी ते बारावीत शिकणाऱ्या सर्व शाळा - कॉलेज विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा खुली आहे.

प्रत्येक शाळा दोन स्पर्धकांचे एकाहून जास्त गट पाठवू शकतो. यावर्षी नागपूर आणि इंदूर या दोन शहरांचाही स्पर्धेत समावेश करण्यात आला आहे. देशाच्या विविध शहरांमध्ये या प्रश्नमंजुषेचे आयोजन केले आहे. विभागीय फेऱ्या झाल्यानंतर राष्ट्रीय पातळीवरील अंतिम फेरीचे आयोजन डिसेंबरला होईल. ज्यांत १४ फेऱ्यांमधून निवड झालेले गट यूएई पर्वाच्या विजेत्या गटाबरोबर टीसीएस आयटी विझच्या विजेतेपदासाठी स्पर्धा करतील. प्रश्नमंजुषेचे प्रश्न तयार करण्यासाठी संशोधनाकरिता इंटरनेटचा ९५.५१ टक्के वापर करण्यात येतो, याची राष्ट्रीय सरासरी ७८.८२ टक्के एवढी आहे. ७१.०८ टक्के पुस्तके व प्रकाशनांचा वापर करण्यात येतो. ज्याचे प्रमाण ५९.१४ टक्के या राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त आहे. ६५.२३ टक्के संशोधनाकरिता वर्तमानपत्रांचा वापर करतात. या स्पर्धेतील विभागीय विजेत्या गटातील प्रत्येकाला गॅलक्सी नोट आणि चषक तसेच उपविजेत्याला गॅलक्सी टॅब आणि चषक तर अंतिम फेरीत पोहोचलेल्यांना पुरस्कार देण्यात येणार आहे.